**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

**प्रथम खबर अहवाल**

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** चंदगड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0012 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/01/2026 21:39

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 22/01/2026

**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/01/2026

**Time From (वेळेपासून):** 14:28 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:07 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/01/2026 **Time (वेळ):** 21:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 020

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/01/2026 21:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 0.1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भूमि अभिलेख कार्यालय, चंदगड , चंदगड ,चंदगड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

10

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेंद्र अशोक सानप

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** अशोक सानप

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,कोल्हापूर,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,कोल्हापूर,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8208971207

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय आप्पासाहेब कानडे | | वडील का नाम : आप्पासाहेब कानडे | 1. बाळेगुंदी,गडहिंग्लज,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 6 नोटा | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 22/01/2026

मी राजेंद्र अशोक सानप वय 40 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8208971207 समक्ष चंदगड जि.कोल्हापूर पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

दिनांक 22/01/2026 रोजी मला मुळ तक्रारदार विवेक वसंत पाटील, वय - 38 वर्षे, व्यवसाय खाजगी नोकरी, रा.मांडेदुर्ग, ता. चंदगड, जि.कोल्हापूर मो.नं. 9404458646 यांनी फोन करून कळविले की, माझे वडील वसंत जक्काप्पा पाटील यांचे नावे मौजे मांडेदुर्ग, ता. चंदगड गावाचे हददीत गट नंबर 859 मध्ये आमचे हिश्याचे 75 गुंठे शेत जमीन आहे. शेत जमीन गट नंबर 859 मधील पुर्ण गटाची मोजणी करण्याकरीता उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय चंदगड येथे वडील वसंत पाटील यांनी दिनांक 03/10/2025 रोजी अर्ज दिला होता. वडील वयोवृध्द असल्याने मी स्वतः सदर कामाचा पाठपुरावा भूमि अभिलेख कार्यालय चंदगड येथे जावुन करीत आहे. त्याप्रमाणे अर्ज दिलेनंतर मी भूमि अभिलेख कार्यालय चंदगड कार्यालयात जावुन तेथे कार्यालातील टेबलवरती काम करणारे विजय कानडे यांना भेटलो व वडीलांनी दिलेल्या अर्जाचे अनुषंगाने मोजणी कधी येईल, मोजणी लवकरात लवकर करा, मला लवकर जमीन मोजणी करून घेणे आवश्यक आहे असे त्यांना सांगितले. त्यावेळी विजय कानडे यांनी मला तुमची मोजणी लवकर करून देतो त्याकरीता कार्यालयातील मोजणी करणा-यांना पाठवतो त्यासाठी 9000/- रूपये दयावे लागतील असे म्हणाले. तसेच मोजणीचे शासकीय चलन 2000/- रूपये भरावे लागतील असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना नियमाप्रमाणे 2000/- रूपये शासकीय चलन भरतो. परंतु तुम्ही सांगितले 9000/- रूपये जास्त होतात तरी पैसे कमी करा असे म्हणालो. त्यावेळी त्यांनी मला 8000/- रूपये दया मी तुमचे काम करून देतो असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना पैशाची जुळणा करून भेटतो असे सांगितले होते. त्यानंतर मी दिनांक 31/10/2025 रोजी उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय चंदगड येथे जावुन मोजणीचे 2000/- रूपये शासकीय चलन भरले व कानडे साहेब यांना भेटलो त्यावेळी कानडे साहेबांनी ठरलेले 8000/- रूपयातील 5000/- आता दया त्याशिवाय लवकर मोजणी येणार नाही असे म्हणुन माझेकडे लाच मागणी केली त्यावेळी मी नाईलाजास्तव कानडे यांना 5000/- रूपये दिले. त्यानंतर मी ब-याचवेळा त्यांना मोजणी लवकर करा म्हणुन भेटत होतो.

त्यानंतर दिनांक 05/12/2025 रोजी उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय चंदगड कार्यालयातील मोजणी करणारे एक कर्मचारी येवुन त्यांनी आमचे वरील गट नंबर 859 मधील हददीचे जी.पी.एस. प्रणालीव्दारे पॉईन्ट नोंदविले. त्यावेळी त्या मोजणी कर्मचारी यांनी थोडया दिवसांनी गटाच्या हददी ठरवुन फायनल नकाशा देतो असे सांगुन निघुन गेले होते. त्यानंतर गटाच्या हददी ठरविणेसाठी भूमि अभिलेख कार्यालय चंदगड येथुन कोणी आले नाही म्हणुन मी दिनांक 11/01/2026 रोजी कार्यालयात जावुन तेथे कानडे साहेबांना भेटुन गटाच्या हददी ठरविणेसाठी व फायनल नकाशा कधी मिळणार याबाबत विचारले असता त्यांनी हददी ठरविण्यासाठी कर्मचारी पाठवतो तसेच मोजणी केलेला फायनल नकाशा देतो त्याकरीता 8000/- रूपये ठरलेले होते त्यातील 5000/- रूपये त्यांना मिळाले असुन राहीलेले 3000/- रूपये दया म्हणजे लवकर हददी ठरविण्यासाठी कर्मचारी पाठवतो तसेच मोजणी झालेनंतर तयार केलेला फायनल नकाशा देतो, त्यासाठी राहीलेले 3000/- रूपये नाही दिले तर काम लवकर होणार नाही असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना यापुर्वी पैसे दिले आहेत आता माझेकडे पैसे नाहीत असे म्हणालो. त्यावेळी त्यांनी 3000/- रूपये दिलेशिवाय माझे काम होणार नाही असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना माझे कामानिम्मीत मी दोन आठवडे बाहेरगावी जाणार आहे तेथुन आलेनंतर मी तुम्हाला भेटतो असे सांगुन निघुन आलो होतो. विजय कानडे यांनी 5000/- रूपये लाच स्विकारली असुन ते आता माझेकडे आणखीन 3,000/- रूपये लाच मागत असल्याची खात्री झाली आहे. परंतु विजय कानडे यांनी मागणी केलेले पैसे देण्याची माझी इच्छा नाही. तरी त्यांचेवर कारवाई करावी म्हणुन तक्रार सांगुन, मी विजय कानडे यांना दिनांक 22/01/2026 रोजी दुपारी

02.30 वा चे सुमारास भूमि अभिलेख कार्यालय चंदगड येथे भेटणेस जाणार आहे. तरी तुम्ही नागनवाडी गावचे हददीत गडहिंग्लज कडुन येताना चंदगड 5 किलोमिटर असे लिहलेल्या मैल दगड जवळ रोड कडेच्या मोकळया जागेत या, तेथे मी तुम्हाला भेटुन माझा तक्रारी अर्ज देतो असे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार पाटील यांना त्यांनी सांगितले ठिकाणी 13.30 वा चे सुमारास पोहचत असल्याचे सांगुन, तेथे त्यांना हजर राहणेस सांगितले. त्यानंतर मी लागलीच मा. सहायक आयुक्त सो॰, समाजकल्याण कार्यालय, विचारे मळा, कोल्हापूर यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच यांना दिनांक 22/01/2026 रोजी तात्काळ गोपनिय कामकाजाकरीता पाठवावे असे कळविले. दिनांक 22/01/2026 रोजी सकाळी 10.15 वा चे सुमारास दोन शासकीय पंच 01) बिपीन दिलीप यादव, पद - शिपाई, शासकीय निवासी शाळा, शिरोळ, 02) शाहु राजाराम प्रधान, कनिष्ठ लिपीक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सहायक आयुक्त समाज कल्याण कोल्हापूर असे हजर झाले. त्यानंतर आम्ही, सापळा पथकातील अंमलदार, शासकीय दोन्ही पंच असे सापळा कारवाई करीता आवश्यक असलेली सामुग्री घेवुन,कार्यालयातील अमंलदार पो.हे.कॉ.संदिप काशीद, पो.हे.कॉ. विकास माने, पो.ना. सचिन पाटील, पो.कॉ.कृष्णा पाटील, चा.स.पो.फौ. गजानन कुराडे असे शासकीय वाहन क्रमांक एम.एच.09, जी.यु. 7591 मधुन कोल्हापूर, गडहिंग्लज, नेसरी असे नागनवाडी, ता.चंदगड गावचे हददीत गडहिंग्लज कडुन येताना चंदगड 5 किलोमिटर असे लिहलेल्या मैल दगड जवळ असले रिकाम्या जागी आलो. त्यावेळी तेथे तक्रारदार उपस्थित होते. त्यावेळी मी तक्रारदार पाटील यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करून दिली. त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार पाटील यांनी वरीलप्रमाणे त्यांची तक्रार पंचाना सांगितली. त्यानंतर तक्रारदार पाटील यांनी त्यांचा तक्रारी अर्ज आमचेकडे दिला. तक्रारदार पाटील यांनी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व दोन्ही पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार पाटील व पंच नं.01 बिपीन यादव यांचेसह भूमि अभिलेख कार्यालय चंदगड येथे विजय कानडे यांची भेट घेणेकरीता पाठवुन, पाटील यांचे तक्रारीप्रमाणे, त्यांचेकडे विजय कानडे हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन,पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून,रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार पाटील व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार पाटील व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. व सदरची निवेदन घेताना मोबाईल मध्ये व्हिडीओ रेकॉर्डीग केले आहे. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 14.28 वाजता चालु करून, तो तक्रारदार पाटील यांचे गळयात काळ्या दो-याच्या साहयाने अडकवुन, तक्रारदार पाटील व पंच नं.1 बिपीन यादव यांना विजय कानडे यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार पाटील यांचे मोटर सायकल क्रमांक एमएच 09 बी.व्ही.3586 वरून पाठविले. त्यावेळी आम्ही सापळा पथक व पंच नं.02 शाहु प्रधान असे गाडीत थांबुन राहीलो. तक्रारदार पाटील व पंच नं.1 बिपीन यादव असे विजय कानडे यांना भेटुन आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 14.58 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 बिपीन यादव यांना भूमि अभिलेख कार्यालय चंदगड येथे विजय कानडे यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी तक्रारदार पाटील यांचे सोबत भूमि अभिलेख कार्यालय चंदगड येथे गेलो. तेथे तक्रारदार विजय कानडे यांना भेटले त्यावेळी त्यांचेत तक्रारदार यांचे कामाचे अनुषंगाने तसेच कार्यालयात सर नाहीत या अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी तक्रारदार पाटील "तेच आणि म्हटलं .. का थांबलं म्हणून आणि आलो, काम.." असे म्हणाले. त्यावेळी कानडे "हु नाय ते रेकॉर्ड दाखवतो म्हटले ना, मोजून येवून, कस बसतय, काय बसतय.." असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील "मला काय वाटलं, राहिलेल्या अमाउंट साठी म्हणून राहिलं का, आणि काय काम.." असे म्हणाले. त्यावेळी कानडे "ते काय झाल्यावर मिळू दे त्याचा काय विषय नाही." असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार "ह" असे म्हणाले. त्यावेळी कानडे "साहेब म्हटलेत ते येतो म्हटलेत, ते आल्यानंतर त्यांना दाखवूया असा विषय झाला त्यामुळं ते थांबलचं, ते मी सांगतो तुम्हाला ते" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार "हं" असे म्हणाले. त्यावेळी कानडे "तुम्हाला ते दाखवतील ते कस बसतय काय बसतयं, क्लिअर करून टाकू" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील "का अमाउंट देवून जावू, काय ? असे म्हणाले. त्यावेळी कानडे "कस पण तुमच्या हेणं , तुमच्या हेणं कसं म्हणशीला तसं " असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील "तुमचे फक्त तीन राहिलेत, तीन हजार रूपये राहिलेत दयायचे मी तुम्हाला .." असे म्हणाले. त्यावेळी कानडे "नऊ..नऊ झालेले ना ते.." असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील "नाय आठ आठ केलेले, आठ केलेले तीन दयायचे राहिलेत तीन हजार तुम्हाला दयायचे राहिलेत मग ते आता देतो, दया म्हटला तर देतो.." असे म्हणाले. त्यावेळी कानडे "आता देवून गेला तर चालेलं, नंतर दिला तरी चालेलं कस ही" असे म्हणाले.

त्यावेळी तक्रारदार "घेवून येवू मग अमाउंट.." असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील "हु " असे म्हणाले. त्यानंतर मी व तक्रारदार पाटील तेथुन निघुन, आपले जवळ आलो आहे असे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार पाटील यांना विजय कानडे यांना भेटण्यास गेले नंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 1 बिपीन यादव यांचे हकीकतीस मिळतीजुळती हकीकत सांगितली.

पंच बिपीन यादव व तक्रारदार पाटील यांचेकडुन हकीकत ऐकुण व्हाईस रेकॉर्डमधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता, तक्रारदार पाटील यांचेकडे विजय कानडे यांनी त्यांची शेतजमीनीची मोजणीचे अनुषंगाने बोलणे करून, रेकॉर्ड दाखवतो, मोजून येवून, कस बसतय, काय बसतयं असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे यापुर्वी 8,000/- रूपयांची मागणी केल्याचे तसेच यापुर्वी तक्रारदार यांचेकडुन पैसे घेतल्याचे तसेच आता राहीलेले 3,000/- रूपये लाचेची मागणी तक्रारदार पाटील यांचेकडे केल्याचे निष्पन्न झाल्याने आम्ही भूमि अभिलेख कार्यालय, चंदगड येथे काम करणारे विजय कानडे यांचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही सर्वांना सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार पाटील यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- दराच्या 06 चलनी नोटा अशी 3,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार पाटील व पंचाना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व, संपुर्ण कार्यवाही, तसेच त्याअनुषंगाने तक्रारदार पाटील व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर अँथ्रासिन लावलेले 3,000/- रूपये तक्रारदार यांचे पॅन्टचे उजव्या बाजुचे पुढील बाजुचे खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार पाटील, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच तक्रारदार पाटील यांना भूमि अभिलेख कार्यालय, चंदगड येथे काम करणारे विजय कानडे यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांनी त्यांचे डोळ्यावरील चष्मा काढुन हातात घेण्याचा आहे असा पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 15.52 वाजता सुरू करून, तो तक्रारदार पाटील यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार पाटील व पंच नं.1 बिपीन यादव असे त्यांचे मोटर सायकलने आम्ही थांबलेल्या ठिकाणाहुन पासुन भूमि अभिलेख कार्यालय चंदगड कडे निघाले. त्यावेळी त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 शाहु प्रधान असे आमचेकडील शासकीय चारचाकी वाहनातुन तक्रारदार यांचे पाठोपाठ भूमि अभिलेख कार्यालय चंदगड जवळ आलो. त्यावेळी तक्रारदार पाटील व पंच नं.1 बिपीन यादव असे भूमि अभिलेख कार्यालय चंदगड कार्यालयात गेले. आम्ही भूमि अभिलेख कार्यालयाचे आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. तक्रारदार पाटील यांनी भूमि अभिलेख कार्यालय, चंदगड येथे काम करणारे विजय कानडे यांनी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता मी, पंच नं.02 शाहु प्रधान व स्टाफ तेथे गेलो. तक्रारदार पाटील यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर 16.07 वाजता बंद करून, तात्काळ लाच स्विकारलेल्या रक्कमेसह विजय कानडे यांना पकडले. त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच यांना सापळा कारवाईवेळी काय हकीकत घडली असे विचारले असता, त्यांनी सांगितले की, त्यावेळी तक्रारदार पाटील "कानडे साहेब हे तुम्हाला पीडीएफ पाठवलं होतं" असे म्हणाले. त्यावेळी कानडे "झालं ते भरल" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील "हु...मगाशी बोल्या प्रमाणं.." असे म्हणाले. त्यावेळी कानडे "हा.. हा.. दया" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील यांनी विजय कानडे यांनी मागितलेप्रमाणे 3,000/- रूपये त्यांना दिले त्यावेळी कानडे यांनी 3,000/- रूपये लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारून त्यांचे पॅन्टचे पुढील बाजुचे उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर तक्रारदार पाटील व कानडे यांचेत तक्रारदार यांचे कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी तक्रारदार पाटील यांनी विजय कानडे यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतरचा नियोजीत इशारा केला असल्याचे सांगितले.

सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या करून पंचाचे समक्ष विजय कनडे यांचेकडुन लाच रक्कम हस्तगत केली. सदर ठिकाणचे व्हिडीओ शुटींग केले आहे. सदर ठिकाणी कार्यलय प्रमुख महेश मोहन कुंभार, उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय चंदगड हे हजर झाले. त्यावेळी आम्ही त्यांना ताब्यात घेतले विजय कानडे यांचेबाबत माहिती विचारली असता त्यांनी विजय कानडे हे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी म्हणुन भूमि अभिलेख कार्यालय चंदगड येथे काम करीत होते. त्यांनी सप्टेंबर 2025 पर्यंत काम केले असुन त्यानंतर त्यांचा वरील योजनेचा कार्यकाल संपलेला आहे. तरीसुध्दा ते कार्यालयात काम करीत बसतात असे सांगितले. तक्रारदार पाटील यांनी भूमि अभिलेख कार्यालय चंदगड येथे अनुषंगाने आवश्यक असणारी कागदपत्रे ताब्यात घेतली. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही चंदगड पोलीस ठाणे येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार विवेक वसंत पाटील यांचे मौजे मांडेदुर्ग, ता.चंदगड येथील गट नंबर 859 या संपुर्ण गटाची मोजणी करणे करीता व हददी ठरविण्यासाठी कार्यालयातील मोजणी करणा-यांना पाठवतो व मोजणी झालेला

फायनल नकाशा काढुन देणेसाठी विजय कानडे, (भूमि अभिलेख कार्यालय चंदगड येथे सप्टेंबर 2025 पर्यंत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी म्हणुन कार्यरत असणारे तसेच त्यानंतर भूमि अभिलेख कार्यालय चंदगड कार्यरत नसताना तेथे कार्यरत आहे असे भासवुन) यांनी भूमि अभिलेख कार्यालय चंदगड येथील अधिकारी कर्मचारी हे ओळखीचे आहेत त्यांचेकडुन मोजणीचे काम करून देतो तसेच मोजणी झालेनंतर फायनल नकाशा देणेसाठी तक्रारदार पाटील यांचेकडे यापुर्वी 8,000/- रूपयांची मागणी केल्याचे तसेच यापुर्वी तक्रारदार यांचेकडुन पैसे घेतल्याचे तसेच आता राहीलेले 3,000/- रूपये लाचेची बेकायदेशिरपणे मागणी करून मागणी केलेली 3,000/- रूपये लाच रक्क्म तक्रारदार पाटील यांचेकडुन, बेकायदेशीरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारताना त्यांना आम्ही व सापळा पथकाने पकडले आहे. म्हणुन माझी विजय आप्पासाहेब कानडे, वय- 32 वर्षे, खाजगी इसम, रा. बाळेगुंदी, ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द माझी फिर्याद आहे.

माझा वरील वर्दी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून, तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

vishwas ramchandra patil(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** vishwas ramchandra

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PI